लोकमत

**Saturday 23/08/2026**

# श्रीयश अभियांत्रिकीच्या 'एमबीए'ची विद्यार्थिनी रक्षंदा चक्रे विद्यापीठात प्रथम

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीयश प्रतिष्ठान संचलित श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या एमबीए विभागातील विद्यार्थिनी रक्षंदा रमेश चक्रे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या एमबीए नियमित एनईपी-२०२४ अभ्यासक्रमाच्या एप्रिल/मे २०२६ परीक्षेत ८७.८० टक्के गुण व ८.७८ CGPA मिळवत विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावला.



रक्षंदा चक्रे

त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे श्रीयश प्रतिष्ठानच्या शैक्षणिक गुणवत्तेला मानाचा तुरा लाभला आहे. उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्या 'कै. गंगाधर दामोदर बापट पारितोषिक' या मानाच्या पारितोषिकासाठी पात्र झाल्या आहेत. रक्षंदा यांच्या यशामागे मेहनत, सातत्य, आत्मविश्वास आणि प्राध्यापकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.

श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरूळे यांनी रक्षंदा, प्राचार्य, विभागप्रमुख व प्राध्यापकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. (RCI)

सकाळ

Saturday 22/08/2026

# श्रीयशच्या संशोधकांना सात पेटंट्स मंजूर

**सातारा परिसर, ता. २१ :** येथील श्रीयश टेक्निकल कॅम्पसमधील संशोधकांनी एकाचवेळी सात पेटंट्स प्राप्त केले. यामध्ये दोन पेटंट्स युनायटेड किंगडमच्या पेटंट कार्यालयाकडून तर उर्वरित पेटंट्स भारतीय पेटंट कार्यालयाकडून मंजूर झाले.

श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजीच्या नावावर मिळालेल्या पहिल्या भारतीय पेटंटमध्ये 'वॉटर क्युरिंग जॅकेट' या अभिनव डिझाइनचा समावेश असून, या संशोधनासाठी डॉ. पी.एम. अर्धापूरकर, डॉ. लोमेश महाजन आणि प्रा. मोनाली किरंगे यांचे योगदान आहे. दुसरे भारतीय डिझाइन पेटंट 'पोर्टेबल हँडी ऑइल एक्स्ट्रॅक्टर' या संशोधनासाठी श्रीयश इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.एम. पाटील तसेच यांत्रिकी विभागातील डॉ. हुलास तोंडे, प्रा. ब्रिजभूषण शुक्ला, प्रा. हर्षल चौथे, प्रा. गौरव देशपांडे, प्रा. आकाश कोडारकर आणि प्रा. दीपक देशमुख यांना प्राप्त झाले.



**सातारा परिसर :** पेटंट मिळालेल्या संशोधकांचा सत्कार करताना बसवराज मंगरुळे.

प्रा. अनिल पालवे यांना 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित एंटरप्राइझ मॅनेजमेंट डिव्हाइस' या शोधासाठी भारतीय डिझाइन पेटंट मिळाले. त्यांना युनायटेड किंगडमकडून आणखी दोन आंतरराष्ट्रीय डिझाइन पेटंट्सही मंजूर झाले. त्यामध्ये 'सोशल मीडिया एंगेजमेंट डिव्हाइस फॉर ब्रँड प्रमोशन' आणि 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी मॉनिटरिंगसाठी एआय आधारित डिव्हाइस' या शोधांचा समावेश आहे. डॉ. सचिन वानखेडे यांना 'सायनेज डिव्हाइसवर प्रदर्शित होणाऱ्या माहिती व मजकुराचे पर्यवेक्षण करण्यासाठी प्रणाली व कार्यपद्धती' या संशोधनासाठी भारतीय डिझाइन पेटंट प्राप्त झाले. शिवाय प्राचार्या डॉ. स्वाती इटगी यांना 'औषध बनवण्यासाठी फ्लेक निर्मिती यंत्र' या शोधासाठी भारतीय पेटंट मंजूर झाले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे, सुरेंद्र गोचके यांनी सर्व संशोधकांचे अभिनंदन केले.

Aurangabad Aurangabad-Today

लोकमत

Friday 24/07/2026

## श्रीयश पॉलीटेक्नीक महाविद्यालयाच्या 155 विद्यार्थ्यांची पेड इंटर्नशिपसाठी निवड

# श्रीयश पॉलिटेक्निकमधील सर्व विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची हमी



**पेड इंटर्नशिपसाठी निवड झालेले विद्यार्थी व महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद**

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीयश प्रतिष्ठान संचलित श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँण्ड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) येथील द्वितीय वर्षातील तब्बल १५५ विद्यार्थ्यांची सशुल्क इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांमध्ये मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि सिव्हिल या शाखांतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना धूत इलेक्ट्रिकल सिस्टम, एलएपीएल लिमिटेड, तसेच मनजित प्राईड्स, माय वर्ल्ड या नामांकित उद्योगसंस्थांमध्ये इंटर्नशिपची संधी मिळाली आहे.

सेंट्रल ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. अनिल पालवे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्राचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा व कौशल्य विकास साधावा, या उद्देशाने ही इंटर्नशिप संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे, सेंट्रल टीपीसी, तसेच प्राचार्य यांचे अभिनंदन केले आहे. (RCI)

लोकमत

Thursday 16/07/2026

श्रीयश पॉलीटेक्नीक महाविद्यालयाच्या 155 विद्यार्थ्यांची पेड इंटर्नशिपसाठी निवड

# श्रीयश पॉलिटेक्निकमधील सर्व विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची हमी



पेड इंटर्नशिपसाठी निवड झालेले विद्यार्थी व महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीयश प्रतिष्ठान संचलित श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) येथील द्वितीय वर्षातील तब्बल १५५ विद्यार्थ्यांची सशुल्क इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांमध्ये मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि सिव्हिल या शाखांतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना धूत इलेक्ट्रिकल सिस्टम, एलएपीएल लिमिटेड, तसेच मनजित प्राईड्स, माय वर्ल्ड या नामांकित उद्योगसंस्थांमध्ये इंटर्नशिपची संधी मिळाली आहे.

सेंट्रल ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. अनिल पालवे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्राचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा व कौशल्य विकास साधावा, या उद्देशाने ही इंटर्नशिप संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे, सेंट्रल टीपीसी, तसेच प्राचार्य यांचे अभिनंदन केले आहे. (RCI)

केसरी

**Friday 24/07/2026**

# देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीयश प्रतिष्ठानमध्ये भव्य रक्तदान शिबीर



**छत्रपती संभाजीनगर** : मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीयश प्रतिष्ठान यांच्या वतीने भव्य "रक्तदान शिबिर " या विशेष उपक्रमाचे आयोजन श्रीयश प्रतिष्ठान, सातारा, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून भाजपाचे श्री. शिरीष बोराळकर, देवगिरी बँकेचे संचालक श्री. किशोर शितोळे तसेच ह्या कार्यक्रमास श्री. अरुण गुडदे हे उपस्थित होते.

श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे सर ह्यांच्या शुभ हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले. श्री. किशोर शितोळे ह्यांनी दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित केल्याबद्दल आणि मोठ्या संख्येने रक्त संकलन केल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. श्री. बसवराज मंगरूळे ह्यांनी सर्व रक्तदात्यांशी वैयक्तिक संवाद साधत रक्तदानाचे महत्व विशद केले. विद्यार्थ्यांचा रक्तदानातील सहभाग सामाजिक जाणीवेचे उदाहरण असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सत्य साई लॅबचे वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी श्री. अरुण वाकडिकर यांनी रक्तदान व थॅलेसेमिया या विषयांवर माहितीपूर्ण मार्गदर्शन केले. लायन्स ब्लड बँकेचे बाबासाहेब कळमकर, डॉ. प्रकाश पाटणी तसेच सत्य साई ब्लड बँक डॉ. महेंद्रसिंग चव्हाण यांच्या टीमने रक्तसंग्रहाचे कार्य यशस्वीपणे पार पाडले.

या रक्तदान यज्ञामध्ये श्रीयशचे अभियांत्रिकी, फार्मसी, एमबीए, बीसीए, पॉलिटेक्निक आणि आयुर्वेद महाविद्यालयाचे एकूण ३१२ विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी रक्तदान केले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठीश्रीयश प्रतिष्ठानचे मख्याधिकारी कर्नल जॉय डॅनियल ह्यांच मार्गदर्शन लाभल तसेच डॉ. स्वाती इटगी प्राचार्य डॉ. सचिन वानखेडे संचालक, श्रीयश व्यवस्थापनशास्त्र, प्रा. ब्रिजभूषण शुक्ला, प्रा. हर्षल चौथे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिल पालवे यांनी केले.

या वेळी सर्व कॉलेजचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

LOKMAT TIMES

Sunday 21/06/2026

# Shreeyash Campus



International Yoga Day was celebrated with enthusiasm at Shreeyash Technical Campus.

The yoga session was guided by Yogaguru Dr Suchita Sawale, Dr Pranjali Shewale, and head of Swasthavritta and Yoga department, Dr Sonal Antapurkar. Vaishnavi Chavan, a student of Shreeyash Ayurvedic College, demonstrated the yoga practices. The importance of yoga in maintaining a healthy life was elaborated.

CEO commander Pradip Singh, principals Dr Swati Itagi (Ayurvedic College), Dr B M Patil (Engineering College), heads of various departments, students, teachers, non-teaching staff of affiliated colleges were present. Faculty members Anil Palve, Brijbhushan Shukla, and others worked for the success. Chairman of Shreeyash Pratishthan Basawraj Mangrule congratulated organisers.

॥ ज्योतिर्मय ॥

**Saturday 13/06/2026**

# श्रीयश पॉलीटेक्नीक महाविद्यालयाच्या १५५ विद्यार्थ्यांची पेड इंटर्नशिपसाठी निवड

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – श्रीयश प्रतिष्ठान संचलित श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) येथील द्वितीय वर्षातील तब्बल १५५ विद्यार्थ्यांची सशुल्क इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांमध्ये मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि सिव्हिल या शाखांतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना धूत इलेक्ट्रिकल सिस्टम, एलएपीएल लिमिटेड तसेच मनजित प्राईड्स माय वर्ल्ड या नामांकित उद्योगसंस्थांमध्ये इंटर्नशिपची संधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांनी नुकतीच संबंधित कंपन्यांमध्ये रुजू होऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात केली आहे.



सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. अनिल पालवे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळावा आणि त्यांच्या कौशल्यांचा विकास व्हावा, या उद्देशाने ही इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे, सेंट्रल टीपीसी तसेच प्राचार्य यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थी रुजू होताना मुख्याधिकारी कमांडर प्रदीप सिंग, प्राचार्य प्रा. संदीप खंडागळे, डीन अकॅडेमिक्स डॉ. पी. एम. अर्धापुरकर व विभागप्रमुख उपस्थित होते.

# ॥ज्योतिर्मय॥

**Saturday 23/05/2026**

SHREEYASH PRATISHTHAN
MISSION EDUCATION

## श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये 'इग्नाइट हॅकाथॉन' उत्साहात; कोडिंग क्लबचे उद्‌घाटन

**ज्योतिर्मय ▭ साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून आयोजित 'इग्नाइट हॅकाथॉन २०२६' हा तंत्रज्ञान महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ५९ संघांनी सहभाग नोंदवला.

या उपक्रमाचे नियोजन प्रथम वर्षाचे विद्यार्थी समन्वयक आदित्य निकम, गायत्री कुलकर्णी व साक्षी धुळे यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने केले. या यशस्वी आयोजनासाठी त्यांना प्रा. स्वप्ना बनगे व सह-समन्वयक प्रा. सचिन रगडे यांचे मार्गदर्शन लाभले.




स्पर्धा दोन टप्प्यांत पार पडली. प्रारंभी सर्व सहभागी संघांना प्रकल्प विकसित करण्यासाठी कालावधी देण्यात आला. त्यानंतर झालेल्या प्राथमिक परीक्षणातून सर्वोत्तम २५ संघांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली. अंतिम फेरीत तज्ज्ञ परीक्षकांनी प्रकल्पांचे सादरीकरण, तपासणी व मूल्यमापन केले.

अंतिम निकालात 'कॅम्पस केअर' संघाने प्रथम क्रमांक पटकावला. 'अर्पेक्स ट्रायो' संघ द्वितीय तर 'ब्रोकन कन्सोल' संघ तृतीय क्रमांकावर राहिला. तसेच 'होरायझन हॅकर्स' व 'ब्रेनबाइट' या संघांना विशेष पारितोषिके प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण म्हणजे महाविद्यालयातील 'कोडिंग क्लब'चे उद्घाटन होय. या क्लबचे उद्घाटन बापूसाहेब शिवाजीराव देवरे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, धुळे येथील डॉ. पी. एस. पाटील तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी लोणेरे येथील डॉ. जी. एस. वरखडे यांच्या हस्ते करण्यात आले. हा क्लब विद्यार्थ्यांच्या कोडिंग कौशल्यांना वाव देणारे प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे.

श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. बसवराज मंगरूळे ह्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी कर्नल जॉय डॅनियल, कमांडर प्रदीप सिंग, प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. एम. अर्धापूरकर, विभागप्रमुख संतोष कुलकर्णी तसेच व्यवस्थापन मंडळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या हॅकाथॉनमुळे विद्यार्थ्यांमधील नाविन्यपूर्ण विचार, तांत्रिक कौशल्ये व समस्या सोडवण्याची क्षमता अधोरेखित झाली असून भविष्यातील तंत्रज्ञ घडविण्याच्या दिशेने हे एक प्रेरणादायी पाऊल ठरले आहे.

# ॥ज्योतिर्मय॥

**Friday 1/05/2026**

SHREEYASH PRATISHTHAN

## महाराष्ट्र दिन आणि मराठी राजभाषा दिन श्रीयश टेक्निकल कॅम्पसमध्ये उत्साहात साजरा

**छत्रपती संभाजीनगर ( प्रतिनिधी):-** आज दिनांक १ मे रोजी श्रीयश टेक्निकल कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र दिन आणि मराठी राजभाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजारोहण माननीय श्री. बसवराज मंगरुळे, अध्यक्ष, श्रीयश प्रतिष्ठान यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या प्रसंगी माननीय मंगरुळे सर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात महाराष्ट्र राज्याची निर्मिती कशी झाली याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेत, राज्यातील नवीन प्रकल्प, औद्योगिक विकास आणि विशेषतः छत्रपती संभाजीनगर येथील औद्योगिक प्रगती यावर प्रकाश टाकला. त्यांनी प्रत्येकाच्या जीवनात शिस्त आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्वही अधोरेखित केले.



या कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी कर्नल जॉय डॅनियल, कमांडर प्रदीप सिंग, तसेच सर्व प्राचार्य उपस्थित होते, ज्यामध्ये डॉ. पी. एम. अर्धापूरकर (डीन अॅकॅडमिक्स), प्रा. एस. एस. खंडागळे (पॉलिटेक्निक), डॉ. सचिन वानखेडे (एमबीए), डॉ. स्वाती इटगी (आयुर्वेद), डॉ. सुरेश सुडके (फार्मास्युटिकल एज्युकेशन), प्रा. अंश लोणारकर (फार्मा), श्री. अमित चव्हाण (प्रशासन व्यवस्थापक) यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिल पालवे, प्रमुख - केंद्रीय प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम देशभक्तीच्या व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

ज्योतिर्मय

Saturday 19/04/2026

# श्रीयश टेक्निकल कॅम्पसमध्ये इंडस्ट्री एक्स्पर्ट पॅनेल डिस्कशनचे उत्साहात आयोजन



ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनल मॅनेजमेंट (एनआयपीएम), छत्रपती संभाजीनगर चॅप्टर आणि सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल, श्रीयश शैक्षणिक समूह संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आज श्रीयश टेक्निकल कॅम्पस येथे ''कौशल्य आणि पदवी: आजच्या काळात चांगली नोकरी किंवा करियरसाठी काय अधिक महत्वाचे?'' या विषयावर उद्योग तज्ज्ञांचे पॅनेल चर्चासत्र यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आले.

या चर्चासत्रामध्ये कॉर्पोरेट क्षेत्रातील मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये श्री. अनुराग कल्याणी (मुख्य मानव संसाधन अधिकारी, निडेक ग्लोबल अप्लायन्सेस इंडिया लिमिटेड), श्री. पुनीत धिंग्रा व्यवस्थापकीय संचालक लॉयल इन्फो सर्विसेस, श्री. विजय साळवे (सहाय्यक महाव्यवस्थापक मानव संसाधन, औद्योगिक संबंध व प्रशासन, मेटलमन ऑटो लिमिटेड), श्री. संदीप पिंपळे (सहाय्यक महाव्यवस्थापक मानव संसाधन, ग्राइंडमास्टर मशिन्स लिमिटेड), श्री. नितीन दाभाडकर (व्यवस्थापक मानव संसाधन व प्रशासन, भोगले ऑटोमोटिव्ह प्रायव्हेट लिमिटेड), श्री. आनंद काकडे (व्यवस्थापकीय संचालक, एएसके एचआर सोल्यूशन्स) तसेच शरयू पगारे (सहाय्यक उपाध्यक्ष मानव संसाधन, चॉइस ग्रुप, मुंबई) यांचा समावेश होता.

उद्योग तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे महत्त्व, पदवी व कौशल्य यांचा समतोल, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील प्रगती, प्रशिक्षणार्थी कालावधी व प्रमाणपत्रांचे महत्त्व, उदयोन्मुख तंत्रज्ञान, तांत्रिक व हस्तांतरणीय कौशल्ये, तसेच उद्योगातील कार्यपद्धती, कार्यसंस्कृती आणि नोकरीची आवश्यकता याबाबत सखोल मार्गदर्शन केले. ''पदवी ही वाहनाची किल्ली आहे'' असे सांगत कौशल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. तसेच व्यावसायिक मार्गदर्शनाचा वापर, उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य उपयोग, प्रशिक्षणार्थी संधी आणि द्वितीय श्रेणी शहरांमधील संधी यावरही विशेष भर देण्यात आला.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. अनिल पालवे (प्रमुख, सेंट्रल टीपीसी) यांनी केले. यावेळी संस्थेचे अधिष्ठाता (शैक्षणिक) डॉ. पी. एम. अर्धापुरकर, संचालक डॉ. सचिन वानखेडे प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक तसेच अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन व पॉलिटेक्निकचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमास २०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. बसवराज मंगरूळे यांनी या यशस्वी उपक्रमाबद्दल सेंट्रल टीपीसी टीमचे अभिनंदन केले.

हा उपक्रम विद्यार्थ्यांना आजच्या स्पर्धात्मक नोकरीच्या क्षेत्रात आवश्यक असलेल्या कौशल्यांची जाणीव करून देणारा ठरला.

# सामना

Monday 30/03/2026

# श्रीयश मिनी मॅरेथॉन उत्साहात



छत्रपती संभाजीनगर, दि. २९ (प्रतिनिधी)- श्रीयश प्रतिष्ठानतर्फे विभागीय क्रीडा संकुल येथे ५ किलोमीटर अंतराची श्रीयश मिनी मॅरेथॉन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या मॅरेथॉनचा मार्ग विभागीय क्रीडा संकुल ते पीर बाजार असा ठेवण्यात आला होता व परतीचा प्रवासही याच मार्गाने करण्यात आला. समाजामध्ये अवयवदानाबाबत जनजागृती निर्माण करणे हा या मॅरेथॉनचा प्रमुख उद्देश होता.

या स्पर्धेत बीड, पुणे, नाशिक, जालना, बुलढाणा, अहिल्यानगर, जळगाव, छत्रपती संभाजीनगर आदी ठिकाणांहून १८ ते ६६ वयोगटातील ३०० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. मॅरेथॉनच्या प्रारंभी फ्युजन इन्स्टिट्यूटचे ऋतुराज सोनवणे यांनी झुंबा व वॉर्म-अप सत्र घेतले. स्पर्धेचे उद्घाटन व हिरवा झेंडा दाखवून सुरवात श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष व आयोजक बसवराज मंगरुळे यांच्या हस्ते करण्यात आली. विजेत्यांना प्रथम क्रमांकासाठी रु. १० हजार व उपविजेत्यास रु. ७ हजार अशी पारितोषिके महापौर समीर राजूरकर यांच्याहस्ते देण्यात आली. श्रीयश प्रतिष्ठानच्या विश्वस्त ऐश्वर्या मंगरुळे, अद्वैत मंगरुळे तसेच मुख्याधिकारी जॉय डॅनियल यांनी मार्गदर्शन केले.प्रमुख समन्वयक म्हणून श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे डॉ. सचिन वानखेडे यांनी कार्य पाहिले. श्रीयश अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, फार्मसी, आयुर्वेद, नर्सिंग महाविद्यालयांचे प्राचार्य, डॉ. बी. एम. पाटील, डीन अकॅडमिक्स डॉ. पी. एम. अर्धापूरकर, प्रा. एस. एस. खंडागळे, डॉ. स्वाती इटागी, डॉ. परेश देशमुख, डॉ. सुरेश सुडके, प्रा. अंश लोणारकर, प्रशिक्षण व प्लेसमेंट प्रमुख प्रा. अनिल पालवे, प्रशासन व्यवस्थापक अमित चव्हाण, एनसीसी एएनओ ले. ब्रिजभूषण शुक्ला यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग होता.

**विविध गटांतील विजेते पुढीलप्रमाणे :**

१८ ते ५० वर्षे (पुरुष गट) प्रथम - अतुल बरडे, द्वितीय - अर्जुन शिंदे १८ ते ५० वर्षे (महिला गट) : प्रथम - शिवानी दिवाकर, द्वितीय - दिशा बोरसे ५० वर्षांवरील (पुरुष गट): प्रथम - रमेश चिवळकर, द्वितीय - राम लिंभारे ५० वर्षांवरील (महिला गट) : प्रथम - विठाबाई कच्छवे, द्वितीय - आभा सिंग.

Shreeyash Pratishthan

Polytechnic | Engineering | Pharmacy | BAMS | MBA| BCA

सकाळ

Tuesday 28/03/2026

# श्रीयश पॉलिटेक्निकमध्ये 'तक्ष्यंत्र: 2026' राज्यस्तरीय तांत्रिक स्पर्धा उत्साहात

## 600 हून अधिक विद्यार्थ्यांनी घेतला विविध तांत्रिक स्पर्धांमध्ये भाग

मराठवाडा केसरी नेटवर्क



छत्रपती संभाजीनगर | श्रीयश प्रतिष्ठानचे श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) यांच्या वतीने पॉलिटेक्निक कॅम्पसमध्ये राज्यस्तरीय तांत्रिक स्पर्धा "तक्ष्यंत्र: २०२६" उत्साहात संपन्न झाली.एकूण सहा तांत्रिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

प्रोजेक्ट स्पर्धा, क्विझ स्पर्धा, पोस्टर सादरीकरण, टेकस्पार्क प्रोजेक्ट कॉन्सेप्ट, पॉवरपॉईंट प्रेसेंटेशन आणि इकॅड चॅलेंज या स्पर्धांचा यात समावेश होता. स्पर्धांमध्ये वेगवेगळ्या महाविद्यालयांमधून जवळपास १५ पेक्षा अधिक महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. तसेच ६०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सारंग कुलकर्णी आणि कर्नल जॉय डॅनियल यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच बक्षीस वितरण समारंभ प्रमुख पाहुणे हरिदास आलुरे यांच्या हस्ते पार पडला. स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी, रोख पारितोषिक आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व समन्वय स्टुडंट कौन्सिलच्या विद्यार्थ्यांनी केला. या कार्यक्रमाचे संघटन सचिव म्हणून प्रा. गणेश काळे आणि प्रा. स्वाती शिराळे यांनी जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाचे संयोजकम्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप खंडागळे यांनी मार्गदर्शन केले. उपक्रमाचे श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष इंजि. बसवराज मंगरुळे यांनी कौतुक करून विद्यार्थ्यांना भविष्यात अशा उपक्रमांमध्ये अधिकाधिक सहभाग घेण्याचे आवाहन केले. तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

महाराष्ट्र टाइम्स

Monday 5/01/2026

SHREEYASH PRATISHTHAN
MISSION EDUCATION

# श्रीयश महाविद्यालयात कार्यक्रम

श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च येथे अभिवादन करण्यात आले. प्रा. सुमित खरात यांनी मार्गदर्शन केले. मार्गदर्शनात सावित्रीबाई फुले यांचा जीवनप्रवास, सामाजिक कार्य, शिक्षण क्षेत्रातील योगदान यावर प्रकाश टाकला. त्यांच्या विचारांचा आजच्या पिढीने स्वीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले. एमबीए आणि बीसीए विभागाच्या विद्यार्थ्यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन सादर केले. यावेळी विभागप्रमुख प्रा. तृप्ती पांडे, प्रा. चैताली आंबलकर, प्रा. संगीता पोनारकर, प्रा. पायल नलावडे आदींची उपस्थिती होती.

# देशोन्नती

**Tuesday 18/11/2025**

# आगामी काळ आयुर्वेदाचा सुवर्णकाळ असेल

## देवेंद्र फडणवीस यांचे श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज उद्घाटनप्रसंगी प्रतिपादन



छत्रपती संभाजीनगर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगर येथे श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज एण्ड हॉस्पिटल रिसर्च सेंटरच्या नवीन वास्तूचे उद्घाटन केले. यावेळी बोलताना, आगामी काळ आयुर्वेदाचा सुवर्णकाळ असेल, असे प्रतिपादन त्यांनी केले. केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालयाने या उपचार पद्धतीला शिक्षण, उपचार आणि संशोधनात चालना दिल्याचे त्यांनी नमूद केले.सातार तांडा भागातील या नवीन वास्तूच्या उद्घाटनप्रसंगी इतर मागास वर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यसभा सदस्य डॉ. भागवत कराड, श्रीयश प्रतिष्ठानचे बसवराज मंगरुळे, सचिव संगिता मंगरुळे, रुग्णालय अधीक्षक डॉ. परेश देशमुख आणि अधिष्ठाता स्वाती इटगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. फडणवीस यांनी यावेळी बसवराज मंगरुळे यांच्या कार्याचे कौतुक केले.

फडणवीस यांनी आयुर्वेदाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, ही उपचार पद्धती भारतीय जीवनशैलीशी सुसंगत असून निसर्गाशी साधर्म्य साधते. वेदांमध्ये 'आयुर्वेद' या नावाने तिचा उल्लेख आहे. आयुर्वेदात केवळ आजाराच्या लक्षणांवर उपचार न करता, त्याच्या मुळाशी जाऊन शाश्वत उपचार केले जातात. जगभरात या उपचार पद्धतीचा वापर वाढत असून, अनेक परदेशी नागरिक भारतात आयुर्वेदिक उपचारांसाठी पर्यटक म्हणून येत आहेत.

कोविड-१९ महामारीच्या काळात रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी आयुर्वेदिक औषधांचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला, असेही फडणवीस यांनी नमूद केले. केंद्र सरकारने या उपचार पद्धतीला विविध मार्गांनी प्रोत्साहन देण्याचे ठरवले आहे. प्रशिक्षित वैद्य तयार करणे हा त्यातीलच एक महत्त्वाचा भाग असून, त्यासाठी आयुर्वेद महाविद्यालयांना चालना दिली जात आहे.

आगामी दशकात भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल आणि २०४७ पर्यंत आर्थिक महासत्ता होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भारत हा जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या असलेला देश आहे. मराठवाड्यातही उद्योगांना चालना दिली जात असून, छत्रपती संभाजीनगर हे इलेक्ट्रिक व्हेईकलचे केंद्र म्हणून उदयास येत आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले.या उद्घाटन सोहळ्याला शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्योतिर्मय

Wednesday 12/11/2025

# श्रीयश प्रतिष्ठानतर्फे 'फिट इंडिया फ्रीडम रन ६.०' मिनी मॅरेथॉनचे आयोजन



**ज्योतिर्मय साहित्य छत्रपती संभाजीनगर** – श्रीयश प्रतिष्ठान, यांच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त तसेच भारत सरकार आणि ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन यांच्या फिट इंडिया मिशन अंतर्गत 'फिट इंडिया फ्रीडम रन ६.०' या मिनी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम श्रीयश टेक्निकल कॅम्पस येथे अत्यंत उत्साहात पार पडला.

या मिनी मॅरेथॉनमध्ये श्रीयश टेक्निकल कॅम्पसच्या विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, एनसीसी कॅडेट्स आणि एनएसएस स्वयंसेवक अशा दोन हजारांहून अधिक सहभागींचा उत्स्फूर्त सहभाग होता.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून राज्यसभा खासदार व माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड उपस्थित होते. तसेच श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष इं. बसवराज मंगरूळे, मुख्य कार्यकारी अधिकारी कर्नल जॉय डॅनियल, माजी महापौर श्री. बापू घडामोडे आणि भाजपाचे श्री. महेश मालवदकर हे मान्यवर उपस्थित होते.

डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून मिनी मॅरेथॉनला सुरुवात करण्यात आली. त्यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना तंदुरुस्त राहण्याचा आणि राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक जपण्याचा संदेश दिला.

स्पर्धेतील विजेत्यांना सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यानंतर सर्व उपस्थितांनी राष्ट्रीय एकता दिनाची शपथ घेतली आणि कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ब्रिजभूषण शुक्ला यांनी केले. तर प्रशासन व्यवस्थापक श्री. अमितकुमार चव्हाण यांनी या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात मोलाचे योगदान दिले. श्रीयश टेक्निकल कॅम्पसमधील अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, फार्मसी, आयुर्वेद, मॅनेजमेंट आणि नर्सिंग महाविद्यालयांचे प्राचार्य, अध्यापकवर्ग तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

॥ज्योतिर्मय॥

**Friday 10/10/2025**

# श्रीयश फार्मसीच्या विद्यार्थ्यांची फार्मासिस्ट दिनानिमित्त स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – नुकत्याच साजऱ्या करण्यात आलेल्या जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त विविध महाविद्यालयांत आयोजित स्पर्धांमध्ये श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ फार्मसी, आष्टा यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीयस्तरीय ई-पोस्टर स्पर्धेत बी. फार्मा विभागातील प्राची सोमवंशी आणि अर्चना कुबेर यांनी विजेतेपद पटकावून संस्थेचे नाव उज्ज्वल केले. या स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांमधून विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. तसेच, मौलाना आझाद एज्युकेशनल ट्रस्टच्या वाय. बी चव्हाण कॉलेज ऑफ फार्मसी, औरंगाबाद येथे आयोजित आंतर महाविद्यालयीन फार्मा प्रॉडक्ट डिटेलिंग स्पर्धेत श्रीयश फार्मसीच्या विद्यार्थिनी विजया हांडे आणि श्रुती जोगी यांनी प्रथम क्रमांक पटकावला असून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. तसेच नंदुरबार तालुका विधायक समितीच्या इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, नंदुरबार यांनी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धेमध्ये निकिता पवार द्वितीय क्रमांक मिळविला. या उल्लेखनीय यशामध्ये प्राध्यापक सुरेश सुडके आणि प्राध्यापक मंगेश घोडके यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य, डॉ. गणेश तापडिया यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, परिश्रम आणि विषयावर निष्ठा, हेच या यशामागचे खरे गमक आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्यांना वाव मिळतो आणि फार्मसी क्षेत्रात नवनवीन दृष्टीकोन विकसित होतात.''

या यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी निवृत्त कर्नल जॉय डॅनियल ह्यांनी विद्यार्थी आणि मार्गदर्शक प्राध्यापकांना शुभेच्छा दिल्या.

सामना

Thursday 09/10/2025

# श्रीयश अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा विजय



छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी)- येथील श्रीयश अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या एमबीए विभागातील श्रीयश स्कॉलर्स या संघाने या वर्षीची प्रतिष्ठित एनआयपीएम बिझनेस क्विझ-२०२५ जिंकून यश संपादन केले. या विजेत्या संघात शंतनू अंकुश व रक्षंदा चक्रे या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

सदरील स्पर्धा नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट (एनआयपीएम), छत्रपती संभाजीनगर चॅप्टर यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या विजयानिमित्त संघाचे मार्गदर्शन प्रा. अरुणिमा पुसदेकर यांनी केले असून, सेंट्रल टीपीसी प्रमुख प्रा. अनिल पालवे यांचेही मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे संयोजन एनआयपीएम नॅशनल कौन्सिल सदस्य अनुराग कल्याणी, एनआयपीएम स्टुडंट्स चॅप्टर कमिटीचे चेअरमन व अतिरिक्त सचिव संदीप पिंपळे, स्टुडंट्स चॅप्टर कमिटीचे व्हाइस चेअरमन समीर करुरकर यांनी केले. तसेच एनआयपीएम सचिव डॉ. सुचित्रा मेंडके यांचीही उपस्थिती लाभली. विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन एनआयपीएम छत्रपती संभाजीनगर चॅप्टरचे चेअरमन पुनीत धिंग्रा, कार्यकारिणी सदस्य विजय साळवे, आशिष वाघ व अन्य कार्यकारिणी मान्यवरांनी केले. श्रीयश प्रतिष्ठानचे चेअरमन बसवराज मंगरुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी कर्नल जॉय डॅनिअल, श्रीयश अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. पी. एम. अर्धापूरकर तसेच श्रीयश मॅनेजमेंट कॉलेजचे संचालक डॉ. सचिन वानखेडे यांनी विद्यार्थ्यांचे यशाचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ज्योतिर्मय

Saturday 28/09/2025




## श्रीयश फार्मसीत जागतिक फार्मसी दिन उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च तसेच श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीत बी.फार्मसी आणि डी.फार्मसीचे विद्यार्थी यांनी उत्साहात जागतिक फार्मसी दिन साजरा केला. यावर्षीची संकल्पना ''थिंक हेल्थ, थिंक फार्मसी'' अशी होती.

या निमित्त विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीविषयी प्रभावी जनजागृती मोहिम राबवली. त्यांनी सादर केलेल्या लघुनाटिकेतून समाजाला व्यसनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम स्पष्टपणे मांडले. लघुनाटिकेतील प्रभावी संवाद आणि विद्यार्थ्यांची उत्कृष्ट अभिनयशैली यामुळे प्रेक्षकांना मोठ्या प्रमाणात जागृती मिळाली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी रील स्पर्धा आयोजित केली, ज्यात त्यांनी लहान-लहान व्हिडिओ तयार करून दैनंदिन जीवनात फार्मासिस्टचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व पटवून दिले. रील्सच्या माध्यमातून लोकांना औषधोपचारांबाबत योग्य मार्गदर्शन, औषधांचा योग्य वापर आणि फार्मासिस्टच्या सामाजिक जबाबदाऱ्यांवरही प्रकाश टाकण्यात आला.

याशिवाय स्ट्रीट शो आणि रॅली द्वारेही संपूर्ण जगासाठी फार्मासिस्टची भूमिका आणि महत्त्व अधोरेखित करण्यात आले. श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे यांनी विद्यार्थ्यांच्या, प्राचार्य व अध्यापकांच्या प्रयत्नांचे मनःपूर्वक कौतुक केले.

लोकमत

**Saturday 25/09/2025**

# श्रीयश टेक्निकल कॅम्पसच्या विद्यार्थ्यांचा "रेड एफएम कॉलेज के टशनबाज" सांस्कृतिक स्पर्धेत विजय







रेड एफएम 93.5 टशनबाज सांस्कृतिक स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांसोबत मा. बसवराज मंगरुळे, तसेच सादरीकरण करताना भावेश व देवेंद्र.

**छत्रपती संभाजीनगर :** (ता. २२/०९/२०२५) दरवर्षीप्रमाणे यंदाही रेड एफएम 93.5 तर्फे त्यांची प्रतिष्ठेची टशनबाज 2025 ही सांस्कृतिक स्पर्धा भव्यदिव्य पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत श्रीयश टेक्निकल कॅम्पसच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकावले. अंतिम फेरीत १२ महाविद्यालयांच्या २० स्पर्धकांचा सहभाग होता.

श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज व हॉस्पिटल रिसर्च सेंटरची विद्यार्थिनी आदिती शिंगणे हिने रॅपिड फायर प्रश्नोत्तर स्पर्धेत विजेतेपद मिळवत ९,९९९ किमतीचे गिफ्ट व्हाउचर्स मिळवले.

दरम्यान, श्रीयश अभियांत्रिकीचे विद्यार्थी महेश वाघमारे आणि पार्थ सराफ यांनी बीट बॉक्सिंग म्युझिकच्या अभिनव प्रयोगाद्वारे ग्रँड फिनालेसाठी पात्रता मिळवली, तसेच एमजीएम विद्यापीठातील सुपरनोव्हा तांत्रिक स्पर्धेत श्रीयश पॉलिटेक्निकच्या एआय एमएल शाखेतील भाग्यश्री दळवी, मिताली नेमाणे, योगिता इंगळे आणि अनुष्का कावडे यांनी रोबो रेसमध्ये सहभाग घेऊन, त्यांच्या रोबोट डिझाइनमुळे विशेष गौरव मिळवला.

श्रीयश अभियांत्रिकीचा विद्यार्थी तन्मय चटारे याने इन्स्टिट्यूट्स् ऑफ इंजिनिअर्सच्या निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवा महोत्सवात श्रीयश व्यवस्थापन महाविद्यालयाच्या ज्योती टाले, शिवानी पवार, आरती हटकर, समर्थ खराड, वरद साळवे आणि शंतनू अंकुश यांनी, तसेच विद्यापीठाच्या पदवी आविष्कार स्पर्धेत जयश्री वानफोडे, सृष्टी बुऱ्हाडे, वैशाली भारती, भाऊसाहेब पवार आणि अभिषेक उन्हाळे या एमबीए व बीसीएच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले.

## शास्त्रीय व पाश्चात्त्य संगीताचा अनोखा संगम

श्रीयश अभियांत्रिकीचा विद्यार्थी भावेश शिंदे आणि श्रीयश पॉलिटेक्निकचा विद्यार्थी देवेंद्र येवले यांनी व्हायोलिन आणि तबल्यावर आधारित शास्त्रीय व पाश्चात्त्य संगीताचा अनोखा संगम सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या या अप्रतिम सादरीकरणामुळे त्यांनी स्पर्धेच्या ग्रँड फिनाले मध्ये विजेतेपद मिळवून ट्रॉफी, प्रमाणपत्र, ११,००० रुपये रोख पारितोषिक, तसेच गिफ्ट व्हाउचर्स मिळवले. (RCI)

सकाळ

**Sunday 21/09/2025**

# श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज अॅन्ड हॉस्पीटल रिसर्च सेंटरतर्फे रॅली



**मराठवाडा केसरी नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज येथे आयुर्वेद दिन निमित्ताने आयुर्वेदचा प्रचार व प्रसार व्हावा हे उद्दीष्ट ठेवून जनसामान्य मध्ये जागरूकता निर्माण करण्याकरिता सातारा गाव परिसरात विद्यार्थी रॅली काढण्यात आली. ही रॅली यशस्वी होण्याकरिता डॉ फातिमा सय्यद, डॉ. निवेदिता ताजने यांनी मोलाचे योगदान दिले.प्राचार्य डॉ स्वाती इटगी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता संस्थेचे अध्यक्ष इंजिनियर बसवराज मंगरूळे यांनी प्राचार्य, सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

सकाळ

Wednesday 17/09/2025

# एन. आय. पी. एम. स्टुडन्ट चॅप्टरचे श्रीयश टेक्निकल कॅम्पसमध्ये उदघाटन



**छत्रपती संभाजीनगर** - श्रीयश अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच श्रीयश व्यवस्थापन अध्ययन व संशोधन महाविद्यालय येथे नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पेर्सोनेल मॅनेजमेंट (एन.आय.पी.एम.) विद्यार्थ्यांच्या शाखेचे उदघाटन झाले. कार्यकारिणी सदस्यांची घोषणा केली. शाखेच्या अध्यक्षा रक्षंदा चक्रे यांनी उपक्रमांची माहिती दिली. उपाध्यक्ष तसेच ट्रूव्ह्यू वॉर्नर इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडचे व्यवस्थापक समीर करुरकर यांनी शाखेची उद्दिष्टे, होणारे फायदे सांगितले. छत्रपती संभाजीनगर एन. आय.पी.एम.शाखेचे अध्यक्ष व लॉयल इन्फोसर्विसेसचे संचालक पुनीत धिंग्रा यांनी कौशल्यविकासाचे महत्त्व स्पष्ट केले व त्यात एन.आय.पी.एम. कसा उपयोगी ठरतो यावर मार्गदर्शन केले. तर, एन.आय.पी.एम.चे राष्ट्रीय परिषद सदस्य व निडेक ग्लोबल अप्लायन्सेस इंडिया लिमिटेडचे मुख्य मानव संसाधन अधिकारी अनुराग कल्याणी यांनी करिअरमध्ये यशस्वी होण्याचा कानमंत्र दिला. श्रीयश प्रतिष्ठानचे प्रा.अनिल पालवे व्यवस्थापन महाविद्यालयाचे संचालक डॉ.सचिन वानखेडे यांनी आभार मानले. 'कॅम्पस टू कॉर्पोरेट: व्यावसायिक रूपांतरणाची तयारी'वर परिसंवाद झाला. ग्राइंडमास्टर संदीप पिंपळे, मेटलमन ऑटोचे विजय साळवे, एंड्युरन्स टेक्नॉलॉजीजचे साकिब सिद्दीकी सहभागी झाले. रोजगारक्षमतेत वाढीसाठी सामंजस्य करार झाला. श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळेंनी शुभेच्छा दिल्या. श्रीयश अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.बी.एम.पाटील, अधिष्ठाता डॉ.पी. एम. अर्धापूरकर उपस्थित होते. सूत्रसंचालन समीक्षा भोपाळेंनी केले.

सकाळ

Sunday 17/8/2025



## श्रीयश टेक्निकल कॅम्पस

मसिआचे अध्यक्ष उत्सव माछर उपस्थित होते. श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे यांच्या हस्ते भारतमाता प्रतिमा पूजन करण्यात आले. याप्रसंगी अभियांत्रिकी, फार्मसी, पॉलिटेक्निक व आयुर्वेद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीत, नृत्य, नाटिका अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. प्रतिष्ठानचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, डीन अकॅडेमिक्स, सेंट्रल टीपीसी प्रमुख, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सकाळ

**Friday 13/8/2025**



सातारा परिसर : 'सकाळ'च्या जागर अभियान उपक्रमात गुरुवारी श्रीयश प्रतिष्ठानच्या शैक्षणिक संकुलातील ॲम्फिथिएटर येथे विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीचा संकल्प केला.

# व्यसनमुक्तीचा संकल्प, महिला सुरक्षेची शपथ

## सातारा परिसरातील 'श्रीयश प्रतिष्ठान'मध्ये 'सकाळ' आणि पोलिस दलाचा उपक्रम

■ सकाळ वृत्तसेवा

सातारा परिसर, ता. १३ : 'व्यसन करणार नाही, करूही देणार नाही, मादक पदार्थांपासून दूर राहीन' असा निर्धार वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी घेतला आणि समाजप्रबोधनासाठी आपला वाटा उचलण्याचा संकल्प केला. 'सकाळ', 'तनिष्का', 'यिन' आणि पोलिस दल यांच्यातर्फे सातारा परिसरातील श्रीयश प्रतिष्ठानच्या शैक्षणिक संकुलातील पाच महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी गुरुवारी (ता. १४) सकाळी 'विद्यार्थी सुरक्षा व व्यसनमुक्ती जागर' अभियान घेण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीबरोबरच महिला सुरक्षेचीही शपथ घेतली.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी कर्नल जॉय डॅनियल, व्यवस्थापन प्रतिनिधी ऐश्वर्या मंगरुळे, सहसचिव अद्वैत मंगरुळे यांच्या मार्गदर्शनात पार पडलेल्या या कार्यक्रमास श्रीयश अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एम. पाटील, फार्मसीचे प्राचार्य डॉ. गणेश तापडिया, तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा. संदीप खंडागळे, श्रीयश आयुर्वेदिक हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ. परेश देशमुख, श्रीयश आयुर्वेदिक महाविद्यालय आणि हॉस्पिटल, प्राचार्य डॉ. स्वाती इटगी, शैक्षणिक अधिष्ठाता प्राचार्य डॉ. पी.एम. अर्धापूरकर, श्रीयश व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयाचे संचालक डॉ. सचिन वानखेडे, सेंट्रल ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट हेड आणि मीडिया समन्वयक प्रा. अनिल पाल्वे, एनएसएस, एनसीसी युनिट प्रमुख प्रा. ब्रिजभूषण शुक्ला, प्रशासकीय व्यवस्थापक अमित चव्हाण, कॅडेट सत्यम राजपूत, जुनिअर अंडर ऑफिसर कॅडेट अमृता गायकवाड, रघुनाथ ईवरे, पी.आय. स्टाफ एनसीसी युनिट आदींची प्रमुख उपस्थिती होती. मोहिमेत दामिनी पथकाच्या उपनिरीक्षक कांचन मिरधे, सायबर पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक गणेश गिरी, भरोसा सेलच्या उपनिरीक्षक सुषमा डांगे, सातारा पोलिस ठाण्याच्या उपनिरीक्षक निर्मला राख, दामिनी पथकाच्या सोनाली निकम, साक्षी चांदणे, बाळू वणे, संदीप पाटील आदींनी सहभाग नोंदवला.

मोहिमेत सर्व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांसह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी व्यसन, सोशल मीडियाचा अतिरेक आणि युवकांच्या जबाबदारीबाबत मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. बी.एम. पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले. सूत्रसंचालन प्रा. अनिल पाल्वे यांनी केले.



'सकाळ माध्यम समूहा'ने 'विद्यार्थी सुरक्षा व व्यसनमुक्ती जागर' महाविद्यालयात घेतल्याबद्दल आभार. हे अभियान कौतुकास्पद असून विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीची शपथ लक्षात ठेवावी. कुणालाही त्रास होणार नाही असे शिस्तीचे वर्तन असावे. व्यसनापासून, दूर राहा. विद्यार्थ्यांना अडचणी असल्यास शिक्षकांना सांगा.
**- प्रा. संदीप खंडागळे,** प्राचार्य, श्रीयश तंत्रनिकेतन



'सकाळ'ने सुरू केलेले जागर अभियान खूप कौतुकास्पद आहे. व्यसनमुक्तीची शपथ घेतली ती शपथ पाळा. रॅगिंग आणि कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहा. कुणालाही विनाकारण त्रास देऊ नका, कुणाचा त्रास असल्यास वेळीच पोलिसांची मदत घ्या.
**- निर्मला राख,** उपनिरीक्षक, सातारा पोलिस ठाणे



सायबर सुरक्षेची जाण ठेवून आपली फसवणूक होणार नाही, यासाठी दक्ष राहा. समाजाच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येकाने सजग राहणे हे आपले कर्तव्य आहे. डिजिटल साधनांचा वापर संयमाने करणे ही आजच्या पिढीची मोठी जबाबदारी आहे. सोशल मीडियाचा अतिरेक टाळा.
**- गणेश गिरी,** उपनिरीक्षक, सायबर पोलिस ठाणे



'सकाळ', पोलिस प्रशासन यांच्यातर्फे सुरू करण्यात आलेले विद्यार्थी सुरक्षा जागर अभियान सध्याच्या काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनो, कुठल्याही व्यसनापासून दूर राहा. कुणाचाही त्रास होत असल्यास वेळीच दामिनी पथकाशी संपर्क साधा.
**- कांचन मिरधे,** उपनिरीक्षक, दामिनी पथक



व्यसन हे आरोग्याचे नुकसान करताना गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी घालते. विद्यार्थ्यांनो व्यसनमुक्तीची शपथ लक्षात ठेवा, रॅगिंगपासून दूर राहून शिक्षणावर लक्ष केंद्रित करा. कोणत्याही प्रसंगाला हिमतीने समोरे जा. वेळीच पोलिसांची, शिक्षकांची मदत घ्या.
**- सुषमा डांगे,** उपनिरीक्षक, भरोसा सेल

**Shreeyash Pratishthan**

Polytechnic | Engineering | Pharmacy | BAMS | MBA| BCA

सकाळ

**Wednesday 13/8/2025**

# 'श्रीयश' महाविद्यालयात इंडक्शन प्रोग्रॅम उत्साहात

## ■ विद्यार्थ्यांना शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक मार्गदर्शन



**पोलीस न्यूज नेटवर्क। गंगापूर**

छत्रपती संभाजीनगर, १२ ऑगस्ट २०२५ – श्रीयश तंत्रनिकेतन महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसीय इंडक्शन प्रोग्रॅमचे आयोजन उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाचा पहिला दिवस दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने सुरू झाला. यावेळी प्राचार्य प्रा. संदीप खंडागळे, प्रशिक्षण व नियुक्ती प्रमुख प्रा. अनिल पालवे, प्रा. हर्षल काळे तसेच विभाग प्रमुख प्रा. विजय भोरडे, प्रा. किरण श्रीखंडे, प्रा. अनिल नाईक, प्रा. श्रीशैल पाताळे व प्रा. गणेश काळे उपस्थित होते.

प्राचार्य प्रा. खंडागळे यांनी एआयसीटीई, एमएसबीटीई आदी संस्थांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. प्रा. हर्षल काळे यांनी कॅम्पस व उपलब्ध अभ्यासक्रमांची ओळख करून दिली, तर प्रा. पालवे यांनी भविष्यातील करिअर संधी आणि प्लेसमेंटबाबत मार्गदर्शन केले. प्रा. विजय भोरडे यांनी कार्यक्रमातील विविध उपक्रमांची माहिती दिली. दुपारी विद्यार्थ्यांना कॅम्पस व विभागीय सादरीकरणाचा अनुभव देण्यात आला.दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांची भेट एसआरपीएफ कॅम्प, सातारा येथे घेण्यात आली. यावेळी शस्त्रप्रदर्शनाचे आयोजन झाले. दुपारच्या सत्रात सोशल मीडियाचा जबाबदार वापर या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

उर्वरित तीन दिवसांसाठी 'शाश्वत ज्ञान' टीमचे मिस्टर जिनी जॉर्ज यांचे मोटिव्हेशनल वर्कशॉप आयोजित करण्यात आले. या संपूर्ण उपक्रमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक आयुष्याबद्दल सर्वांगीण मार्गदर्शन मिळाले.

केसरी
राष्ट्रीय ठेवा

Sunday 10/8/2025

# श्रीयश आयुर्वेद महाविद्यालयात संस्कृत दिवस साजरा



■ छत्रपती संभाजीनगर । श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज आणि हॉस्पिटल रिसर्च सेन्टर येथे संस्कृत दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज मधील संहिता सिद्धांत विभाग व संस्कृत क्लबच्या मार्फत यावेळी महाविद्यालयात अनेक उपक्रम सप्ताहात घेण्यात आले. यावेळी विभागाचे प्रमुख डॉक्टर मिलिंद मालगुंडकर, विभागाचे इतर वैद्य शिक्षक वृंद यांनी देखील सहकार्य लाभले .या प्रसंगी विद्यार्थ्यांनी अनेक स्पर्धेसाठी उत्साहाने सहभाग नोंदवला. संस्कृत दिवस साजरा करतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि संस्थेचे सीईओ कर्नल जॉय डॅनियल, प्राचार्य डॉ. इटगी, डॉ. परेश देशमुख, अन्य शिक्षक वृंद यांनी दीप प्रज्वलन करून धन्वंतरी पूजन करून या कार्यक्रमाची सुरुवात केली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी संस्कृत दिनानिमित्त संस्कृत मध्ये विविध प्रदर्शनी, स्पर्धा ,नाट्यकृती , गाण- संगीत, भाषणे असे अनेक उपक्रम सादर केले . संस्कृत क्लबच्या सचिव प्राध्यापिका सुरेखा गव्हाणे यांनी मुलांना संस्कृत दिनानिमित्त संस्कृत आणि आयुर्वेदाची सांगड घालून संस्कृत भाषेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. यावेळी प्राचार्य डॉ. स्वाती इटगी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. हा कार्यक्रम यशस्वी झाल्याबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरूळे यांनी विद्यार्थी, प्राचार्य, विभाग प्रमुख व संबंधित वैद्य शिक्षक वृंदांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.

**Shreeyash Pratishthan**

Polytechnic | Engineering | Pharmacy | BAMS | MBA| BCA

DB स्टार

**Wednesday 9/7/25**

# श्रीयश अभियांत्रिकी• तंत्रनिकेतनला 'अतिशय उत्तम' मानांकन जाहीर

छत्रपती संभाजीनगर| श्रीयश प्रतिष्ठानचे श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (तंत्रनिकेतन) यांना महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण मंडळाने मॉनिटरिंग (२०२४-२५) अंतर्गत घेतलेल्या मूल्यांकनात 'अतिशय उत्तम' हे मानांकन मिळाले आहे. विभागीय पातळीवर मिळवलेले गौरवशाली मानांकन : मॉनिटरिंग दरम्यान खालील सर्व विभागांना 'अतिशय उत्तम' रेटिंग प्राप्त झाले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बसवराज मंगरूळे यांनी प्राचार्य, सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

सकाळ

Tuesday 8/7/25



छत्रपती संभाजीनगर : श्रीयश फार्मसी महाविद्यालयात पदवी प्रदान सोहळ्यात उपस्थित विद्यार्थी व मान्यवर.

# ‘श्रीयशच्या फार्मसी’त पदवी प्रदान सोहळा

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीयश इन्स्टिट्यूट फार्मास्युटिकल एज्युकेशन अँण्ड रिसर्च येथे पदवी व पदव्युत्तर २०२०-२४ बॅचचा पदवी प्रदान सोहळा सोमवारी (ता. सात) उत्साहात पार पडला. यावेळी ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लि.चे उपाध्यक्ष माणिकम पेरुमल, वरिष्ठ व्यवस्थापक डॉ. प्रशांत मुसमाडे, व्यवस्थापक सतीश खराड हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी श्रीयश प्रतिष्ठानचे चेअरमन बसवराज मंगरूळे होते. प्राचार्य डॉ. गणेश तापडिया यांनी विद्यार्थ्यांना फार्मासिस्ट म्हणून समाजातील योगदानाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमात बी.फार्म.च्या ९५ विद्यार्थ्यांना आणि एम.फार्म.च्या १९ अशा एकूण ११४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. आयक्यूएसीप्रमुख डॉ. मिलिंद कांबळे, प्रा. म्हैसमाळे आणि प्रा. मीनल चौधरी यांची यावेळी उपस्थिती होती.

Aurangabad, Aurangabad Today

ज्योतिर्मय

Saturday 5/7/2025

# श्रीयश फार्मसीचे ४७ विद्यार्थी नायपर आणि जी पॅट परीक्षा उत्तीर्ण

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयातील बी. फार्म पदवीचे विद्यार्थी यांनी राष्ट्रीय स्तरावरील नायपर (नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च) व जीपॅट (ग्रॅज्युएट फार्मसी ऍप्टिट्यूड टेस्ट) २०२५ या महत्त्वाच्या स्पर्धा परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादन करत संस्थेचे नाव उज्वल केले आहे. एवढ्या मोठया संख्येने, कठीण समजल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये विद्यार्थी उत्तीर्ण होणारे श्रीयश फार्मसी हे पहिलेच महाविद्यालय ठरले आहे.

या दोन्ही परीक्षांमध्ये एकूण २२ विद्यार्थी नायपर तर २५ विद्यार्थी जीपॅट परीक्षेत यशस्वी झाले आहेत. विशेष म्हणजे, १५ विद्यार्थ्यांनी दोन्ही परीक्षा उत्तीर्ण करून एक वेगळाच उच्चांक प्रस्थापित केला आहे.

ऋषिकेश फटाले, संघप्रिय बनकर, प्रिया उणे, रितेश ठोंबरे, अभिषेक डेंगळे, साक्षी मार्खेलकर, साक्षी सुराशे, शुभदा नावेकर, श्रीकृष्णा खेडकर, साक्षी कानडे, पायल आडे, पायल गवळी, कैलास कर्पे, स्नेहा खंदारे आणि वैष्णवी बांगर या विद्यार्थ्यांनी नायपर व जीपॅट दोन्ही परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केल्या आहेत.

संस्कृती गिरी, अंकिता आढाव, प्रतीक्षा मनगटे, अपूर्वा गव्हाणे, रत्नमाला मंडले, चैतन्य जगताप आणि प्रियंका गायकवाड हे विद्यार्थी केवळ नायपर मध्ये तर कल्याणी वर्मा, दिनांशु बाराते, श्रुती जोगी, श्रुती पद्ये, सुमित बारतूने, प्रीती खरात, संध्या शेजूळ, रोशनी पावरा, पवन गागलवाड आणि कोमल पोटे यांनी जीपॅट परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे. ह्या यशासाठी सातत्याने प्रयत्न आणि मार्गदर्शन केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी संस्थेचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरूळे, प्राचार्य डॉ. गणेश तापडिया आणि प्राध्यापकांचे आभार मानले.

लोकमत

Saturday 5/7/2025

# श्रीयश इंजीनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी बनवली चेहऱ्यावर आधारित अभिनव हजेरी प्रणाली



श्रीयश प्रतिष्ठानच्या यशस्वी विद्यार्थ्यांसोबत मार्गदर्शक प्राध्यापिका....

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीयश प्रतिष्ठानच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातील डेटा सायन्सच्या तृतीय वर्षाच्या धनंजय कोठावले, समीर शेख, गौरव डिके, सुनील काकडे ह्या विद्यार्थ्यांनी डीप लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर करून एक नाविन्यपूर्ण "फेस रेकग्निशन अटेंडन्स सिस्टीम" विकसित केली आहे.

पारंपरिकरित्या अंगठ्याचे ठसे, डोळ्यांची बुबुळे किंवा चेहऱ्याद्वारे हजेरी नोंदविली जाते, ज्यामध्ये एका वेळी एकाचीच ओळख केली जाते.

मात्र या विद्यार्थ्यांनी एका फ्रेममध्ये अनेक चेहऱ्यांची ओळख करून सामूहिकरित्या उपस्थिती नोंदवण्याची पद्धत प्रथमच विकसित केली आहे, जी सोपी, अचूक व कार्यक्षम आहे. या प्रणालीसाठी विद्यार्थ्यांनी डीप लर्निंग, पायथॉन फ्लास्क बॅकएंड, मल्टी टास्क कॅसकेडेड कनवलशनल नेटवर्क्स, ओपनसीव्ही, एसक्यू लाइट यांचा वापर केला आहे. याचे महाविद्यालयाद्वारे पेटंट नोंदणीकरण सुरु आहे. या प्रकल्पामध्ये प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील व प्रा. पी. एस. ब्राह्मणे यांचे मार्गदर्शन लाभले. श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले. (RCI)

# नवराष्ट्र

**Tuesday 1/7/25**

# श्रीयशचा पदवीप्रदान सोहळा उत्साहात

## बी. टेक, एम. बी. ए. च्या विद्यार्थ्यांनी स्वीकारली पदवी

छत्रपती संभाजीनगर, (शहर प्रतिनिधी) श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये बी. टेक., आणि एम.बी.ए. २०२३-२४ बॅचच्या विद्यार्थ्यांचे पदवीप्रदान सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या प्रादेशिक कार्यालयाचे सहसचिव डॉ. किरण लाढाणे तर विशेष अतिथी म्हणून श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभियंता बसवराज मंगरुळे हे उपस्थित होते. यावेळी डॉ. लाढाणे यांनी तंत्रज्ञान अतिशय वेगाने बदलत आहे. सध्या हे युग कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगचे आहे. या स्पर्धात्मक युगात यश मिळवण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाशी सातत्याने संपर्कात राहणे आणि सतत कौशल्यवृद्धी करणे गरजेचे आहे, असे सांगितले.

प्राचार्य डॉ. बी. एम.पाटील यांनी प्रास्ताविक केले. तर मंगरुळे यांनी चिकाटी, परिश्रम आणि महत्त्वाकांक्षा ही यशाची त्रिसूत्री आहे. एक अभियंता कोणतेही मोठे उद्दिष्ट गाठण्याची क्षमता बाळगतो. विद्यार्थ्यांनी ही क्षमता ओळखून तिचा योग्य वापर करावा, असे सांगितले.




### विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी स्वीकारली पदवी

या पदवी समारंभात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे येथील कंप्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि सिव्हिल अभियांत्रिकी या शाखांमधील १३५ विद्यार्थ्यांना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, येथील एम.बी. ए. विभागातील ४९ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी श्रीयश अभियांत्रिकी व पॉलिटेक्निकचे प्राचार्य, श्रीयश मॅनेजमेंटचे संचालक, डीन अकॅडेमिक्स, सेंट्रल टी. पी. सी प्रमुख, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते,

आधुनिक केसरी

**Wendnesday 25/6/25**

# श्रीयश अभियांत्रिकी महाविद्यालयात 'टेक्नोयश २०२५' तांत्रिक प्रकल्प स्पर्धेचे उत्साहपूर्ण आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, छत्रपती संभाजीनगर येथे "टेक्नोयश २०२५" या तांत्रिक प्रकल्प प्रदर्शन व स्पर्धेचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या उपक्रमात यावर्षी एकूण १४२ बी. टेक. तिसऱ्या आणि अंतिम वर्षाचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

या स्पर्धेत मेकॅनिकल, कॉम्प्युटर, सिव्हिल, इलेक्ट्रिकल, डेटा सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर विभागातील विद्यार्थ्यांनी आपले नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाखांमधील अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारित सौर ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने, चार्जिंग सिस्टीम, रोबोटिक्स, ड्रोन टेक्नॉलॉजी, ऊर्जा मीटर, आयओटी आधारित प्रकल्प, थ्रीडी प्रिंटिंग, फेस रेकग्निशन सिस्टीम, मोबाईल प्रोटेक्शन ॲप्स, क्रॉप रेकमेन्डेशन सिस्टीम अशा अनेक प्रकल्पांची प्रात्यक्षिके सादर केली. या स्पर्धेचे उद्घाटन श्रीयश प्रतिष्ठानचे मुख्य कार्यकारी अधिकारी कर्नल जॉय डॅनिएल यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, शैक्षणिक अधिष्ठाता,



विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्याधिष्ठित शिक्षणाची रुजवणूक होत असून त्यांना नोकरीसाठी आवश्यक तांत्रिक व व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्यास मदत होत आहे, असे मत यावेळी श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरूळे ह्यांनी व्यक्त केले.

॥ज्योतिर्मय॥

Wendnesday 25/6/25

# श्रीयश प्रतिष्ठाणद्वारे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**ज्योतिर्मय साहित्य छत्रपती संभाजीनगर** – श्रीयश टेक्निकल कँपस, छ. संभाजीनगर येथे दिनांक २१ जून २०२५ रोजी योग फॉर वन अर्थ वन हेल्थ या वर्षीच्या घोषवाक्यानुसार आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात श्रीयश अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, फार्मसी, आयुर्वेद, एमबीए व बीसीए विभागातील विद्यार्थी आणि प्राध्यापकवर्ग यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

या योग दिनानिमित्ताने भारतीय योग संस्थान, नवी दिल्लीचे प्रथितयश योग प्रशिक्षक डॉ. उत्तम काळवणे यांनी सर्व विद्यार्थ्यांना व उपस्थित प्राध्यापकांना योगासने, प्राणायाम व ध्यान याचे सखोल मार्गदर्शन केले व प्रत्यक्ष सत्र घेतले.

कार्यक्रमामध्ये शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने योगाचे महत्त्व विशद करण्यात आले. संपूर्ण कँपसने सकारात्मक उर्जा अनुभवली व विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दल नवीन प्रेरणा निर्माण झाली. श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे यांनी या ह्या कार्क्रमाच्या यशाबद्दल प्राचार्य, शिक्षक आणि सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

दैनिक दिव्य मराठी

**Thursday 8/5/2025**

# श्रीयश प्रतिष्ठान • फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची 'इपका लॅब्ज'ला शैक्षणिक भेट



**छत्रपती संभाजीनगर |** श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च महाविद्यालयाच्या औषधनिर्माणशास्त्र शाखेतील तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी वाळूज औद्योगिक वसाहतीमधील इपका लॅब्ज कंपनीला शैक्षणिक भेट दिली. उद्योगातील कच्चा माल, तयार माल, उत्पादन प्रक्रिया, प्रॉडक्शन एरिया, असेप्टिक एरिया आदींची माहिती घेतली. या शैक्षणिक भेटीत एकूण ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

॥ ज्योतिर्मय ॥

Tuesday6/5/2025



सातारा परिसर : श्रीयश अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी धूत इलेक्ट्रिकलला औद्योगिक भेट दिली.

# श्रीयश अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांची धूत इलेक्ट्रिकलला औद्योगिक भेट

**सातारा :** श्रीयश अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या बी.टेक. प्रथम वर्ष विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कॉम्प्युटर शाखेच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच शेंद्रा येथील धूत इलेक्ट्रिकल सिस्टिम्स लिमिटेड कंपनीला औद्योगिक भेट दिली. विद्यार्थ्यांना औद्योगिक वातावरण, कार्यपद्धती व उत्पादनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा यासाठी ही भेट होती. कंपनीचे मनुष्यबळ मॅनेजर यांनी विद्यार्थ्यांना कंपनीचा इतिहास, मूल्ये, उत्पादने, कार्यपद्धती व उत्तम व्यवस्थापन पद्धतींबाबत माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उत्पादन विभागात हार्नेसचे उत्पादन व गुणवत्ता नियंत्रण प्रक्रिया जवळून पाहिली. प्लांट हेड व कॉर्पोरेट मनुष्यबळ हेड यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांना उद्योग क्षेत्राबाबत मार्गदर्शन केले. एकूण ४९ विद्यार्थ्यांनी या भेटीत सहभाग घेतला. श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरूळे यांनी या उपक्रमाचे आयोजन केले.

॥ ज्योतिर्मय ॥

Tuesday 6/5/2025




# श्रीयश प्रतिष्ठानच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची धूत इलेक्ट्रिकल सिस्टिम्सला औद्योगिक भेट

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर (शेंद्रा)** – श्रीयश अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या बी.टेक प्रथम वर्ष विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर शाखेच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच धूत इलेक्ट्रिकल सिस्टिम्स लिमिटेड, शेंद्रा येथे औद्योगिक भेट दिली.

या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना औद्योगिक वातावरण, कार्यपद्धती व उत्पादनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा असा होता. सुरुवातीला कंपनीचे मनुष्यबळ मॅनेजर यांनी विद्यार्थ्यांना कंपनीचा इतिहास, मूल्ये, उत्पादने, कार्यपद्धती व उत्तम व्यवस्थापन पद्धतींबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उत्पादन विभागात हार्नेस चे उत्पादन व गुणवत्ता नियंत्रण प्रक्रिया जवळून पाहिली.

यावेळी प्लांट हेड व कॉर्पोरेट मनुष्यबळ हेड यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांना उद्योग क्षेत्रातील ज्ञान व मार्गदर्शन दिले. एकूण ४९ विद्यार्थ्यांनी या भेटीत सहभाग घेतला.

श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष  बसवराज मंगरुळे यांनी या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले व कंपनी व्यवस्थापनाचे आभार मानले की, त्यांनी विद्यार्थ्यांना अशी मौल्यवान संधी उपलब्ध करून दिली.

॥ज्योतिर्मय॥

Thursday 20/3/2025

# श्रीयश फार्मसी महाविद्यालयात श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन



**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – श्रीयश इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एजुकेशन रिसर्च मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सहा दिवसीय शिबीराचे गांधेली येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात स्वयंसेवकांनी विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

शिबिरादरम्यान वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, पाणी संवर्धन रॅली, मतदार जागृती सर्वे क्षण, तसेच डिजिटल साक्षरता सर्वेक्षण घेण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, आरोग्य व स्वच्छता मार्गदर्शन, गुड टच-बॅड टच जनजागृती, तसेच व्यसनमुक्ती व बालविवाहविरोधी पथनाट्य सादर करण्यात आले. याशिवाय नेत्रतपासणी शिबिर व आरोग्य जागरूकता कार्यक्रम राबविण्यात आले. शिबिराच्या शेवटच्या दिवशी जागतिक महिला दिन उत्सव व सास्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

शिबिराच्या समारोप कार्यक्रमात असा समाज उपयोगी उपक्रम आयोजित केल्याबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष इंजि. बसवराज मंगरूळे, यांनी श्रीयश फार्मसीचे प्राचार्य तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

दैनिक दिव्य मराठी

Sunday 23/2/2025

# श्रीयश अभियांत्रिकी महाविद्यालय

## • कृत्रिम बुद्धिमत्तेवर कार्यशाळा



छत्रपती संभाजीनगर | श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयात कार्यशाळा घेण्यात आली. ही कार्यशाळा प्राध्यापकांसाठी होती. ज्यात कृत्रिम बुद्धिमत्ता व चॅट जीपीटी या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी छत्रपती संभाजीनगर आणि इ अँड आयसीटी अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने फेस टू प्रोजेक्टद्वारे घेतली. यात ६२ जणांचा सहभाग होता.

सामना

Saturday 8/2/2025



# श्रीयश फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी जिंकली सात पदके

छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) - डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठअंतर्गत आविष्कार २०२४-२५ या संशोधनात्मक स्पर्धेत झोनल लेव्हलमध्ये श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च मधील एम. फार्मसी आणि बी. फार्मसीच्या मुलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत ८ पदके पटकावली आहेत. या स्पर्धेत श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्चमधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अशा एकूण २३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. पदव्युत्तर विभागातून पूजा काकडे, अक्षय शेजूळ, प्रियंका माने, श्रीकांत भोसले, पवन साळवे, तर पदवी विभागातून निकुंज मोटानी, हर्ष पोलकम व अभिषेक शिंदे यांनी सुवर्ण, रौप्य व कांस्य अशी एकूण आठ पदके जिंकत विद्यापीठस्तरावरील फेरीत प्रवेश मिळविला. स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचे श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष इंजि. बसवराज मंगरूळे, सहसचिव अद्वैत मंगरूळे, विश्वस्त ऐश्वर्या मंगरूळे, मुख्य कार्यकारी अधिकारी निवृत्त कर्नल जॉय डॅनियल, श्रीयश फार्मसीचे प्राचार्य डॉ. गणेश तापडिया, समन्वयक डॉ. मिलिंद कावळे व प्रा. विनायक म्हैसमाळे आदींनी अभिनंदन केले आहे.

आधुनिक केसरी

**Saturday 8/2/2025**

# श्रीयश पॉलिटेक्निक येथे खो-खो सामने उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीयश पॉलिटक्निक छत्रपती संभाजीनगरला ह्या वर्षीचे आंतर अभियांत्रिकी पदविका क्रीडा संघटनेच्या (आय ई डे सा) विभाग स्तरीय खो खो स्पर्धेचे यजमानपद मिळाले होते. ह्या संघटनेद्वारे कबड्डी, खो खो. क्रिकेट, चेस, कॅरम अश्या विविध स्पर्धांचे विभागीय स्तरीय आयोजन केले जाते. त्याअंतर्गत दिनांक ३ ते ६ फेब्रुवारीला हे सामने आयोजित करण्यात आले. श्रीयश पॉलिटेक्निकचे प्राचार्य संदीप खंडागळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. ह्या सामन्यांमध्ये मराठवाड्यातून मुलांचे १४ तर मुलींचे १७ संघ समाविष्ठ झाले होते. शासकीय तंत्र निकेतन जालना संघाने मुलांमध्ये तर शासकीय तंत्रनिळेतन संभाजीनगर संघाने मुलींचे विजेतेपद प्राप्त केले. दोन्ही गटात श्रीयश पॉलिटेक्निक हे उपविजेते ठरले. हे विजेते संघ उच्चस्तरीय सामन्यांसाठी आता पात्र ठरले आहेत. यावेळी शिक्षक क्रीडा समन्वयक महेश जाधव ह्यानी काम पाहिले. संस्थेचे अध्यक्ष इंजी. बसवराज मंगरुळे ह्यानी विजेत्यांना शुभेच्छा दिल्या. अश्याच विभागीय कब्बडी स्पर्धेत श्रीयश पॉलिटक्निक संघ उपविजेते ठरले.




**Shreeyash Pratishthan**

Polytechnic | Engineering | Pharmacy | BAMS | MBA| BCA

# लोकमत

**Sunday 26/1/2025**



श्रीयश प्रतिष्ठानमध्ये प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांसह विद्यार्थी.

## 'श्रीयश'च्या कॅम्पसमध्ये प्रजासत्ताक दिन



**छत्रपती संभाजीनगर :** श्रीयश प्रतिष्ठानच्या टेक्निकल कॅम्पसमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. माजी केंद्रीय मंत्री खा. डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बसवराज मंगरुळे यांच्यासह कॅम्पसमधील अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, औषधनिर्माणशास्त्र, एमबीए, आयुर्वेद आणि नर्सिंग महाविद्यालयांची उपस्थिती होती. ध्वजारोहण झाल्यानंतर एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी परेड सादर केली. त्याचे नेतृत्व लेफ्टनंट प्रा. बृजभूषण शुक्ला यांनी केले.

डॉ. भागवत कराड यांनी विद्यार्थ्यांना यावेळी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, रिफॉर्म, परफॉर्म आणि ट्रान्सफॉर्म या त्रिसूत्रीने भारताला एक विकसित राष्ट्र बनवून विश्वगुरू बनवायचे आहे. त्यासाठी भारतीय संविधानाचा इतिहास, त्याचे महत्त्व आणि आजच्या पिढीच्या योगदानाची आवश्यकता असल्याचेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी नृत्य, भाषणे, देशभक्तीपर गीते आणि मूकनाट्य सादर केले. प्रा. अरविंद वाव्हळे यांनी गीते सादर केली. विद्यार्थी पृथ्वीराज दौड याचा राष्ट्रीय पातळीवरील बक्षीस मिळविल्याबद्दल सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्याचे वडील प्रकाश दौड यांची विशेष उपस्थिती होती. याच कार्यक्रमात श्रीयश प्रतिष्ठानच्या ई-न्यूजलेटरचे विमोचनही करण्यात आले. संचालन प्रा. गजानन पारीख यांनी केले. (वा.प्र.)

सकाळ

Sunday 16/1/2025




**छत्रपती संभाजीनगर :** विजेत्या स्पर्धकांसोबत संस्थेचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे, उपस्थित मान्यवर.

# ‘श्रीयश टेक्निकल’मध्ये मॅरेथॉन

**छत्रपती संभाजीनगर, ता. १५ :** अवयवदान कार्याच्या जनजागृतीसाठी श्रीयश टेक्निकल कॅम्पसमध्ये रविवारी (ता. १२) भव्य मॅरेथॉन स्पर्धा पार पडली. अवयवदानाचे महत्त्व समाजापर्यंत पोचवणे, त्याविषयी जनजागृती करणे या उद्देशाने मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे यांनी दिली. महिला, पुरुष अशा दोन गटांत पाच किलोमीटरची मॅरेथॉन घेण्यात आली.

१८ पेक्षा कमी आणि १८ पेक्षा जास्त वयोगटात घेण्यात आलेल्या मॅरेथॉनमध्ये मराठवाड्यासह पुणे, मुंबई, नंदूरबार विदर्भ, बुलढाणासह इतर जिल्ह्यातील ४३० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. पुरुष गटात अंगद कान्हेरे प्रथम, तर अर्जुन शिंदे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. महिला गटात साक्षी परीट प्रथम, तर पूजा राजपूत यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. लहान मुलांच्या गटात वनराज कांबळे यांना प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात आले. मॅरेथॉनमध्ये आठ ते ५८ वर्षे वयोगटातील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. ज्युबिलंट फार्मा, मुंबईचे उपाध्यक्ष भगवंत बोराखेडीकर आणि लॉयल इन्फोसर्व्हिसेसच्या एचआर मॅनेजर नेहा अग्निहोत्री यांनी मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदविला. स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षिसे, पदके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. बक्षिसे बसवराज मंगरुळे, जनहित प्रबोधन संस्थेचे संचालक शैलेंद्र नन्नावरे, ॲड. राहुल शिंदे, स्वराज माने आणि गायत्री सपकाळ यांच्या हस्ते देण्यात आले. सर्व सहभागींसाठी प्री-वर्कआउट सत्र, झुंबा सत्र, चहा, नाश्ता आणि इतर सुविधा देण्यात आल्या. श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज आणि हॉस्पिटलतर्फे वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात आली. कार्यक्रमाला श्रीयश प्रतिष्ठानचे मुख्य कार्यकारी अधिकारी निवृत्त कर्नल जॉय डॅनियल, प्राचार्य डॉ. गणेश तापडीया, प्राचार्य प्रा. संदीप खंडागळे, प्राचार्य डॉ.बी.एम. पाटील, डीन अकॅडेमिक्स डॉ.पी.एम. अर्धापूरकर, प्राचार्य डॉ. परेश देशमुख, प्राचार्या प्रा. भाग्यशाली पवार, संचालिका डॉ. ज्योती मुंडे, विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. गजानन पारिख यांनी केले.

**सकाळ**

**Thursday 17/10/2024**




**छत्रपती संभाजीनगर :** श्रीयश पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करताना इस्रोचे शास्त्रज्ञ.

# 'स्पेस आणि हवामान बदल'मध्ये श्रीयश पॉलिटेक्निकचे यश

**छत्रपती संभाजीनगर :** इस्त्रोच्या सुवर्ण महोत्सवी 'स्पेस आणि हवामान बदल' या कार्यक्रमांतर्गत स्पर्धेत शहरातील श्रीयश अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत नऊ पदके मिळविली. तंत्रनिकेतनच्या 'आर्टिफिशीअल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग' अर्थात 'एआय' विभागाच्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. इस्त्रोच्या शास्त्रज्ञांनी स्पर्धेचे परीक्षण केले. इस्त्रो गट संचालक डॉ. एम. ए. फैजी आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. आर श्रीनिवासन यांच्या विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

स्पर्धेत 'एआय' विभागप्रमुख प्रा. गणेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली ७६ विद्यार्थी सहभागी झाले होते. यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बसवराज मंगरूळे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी निवृत्त कर्नल जॉय डॅनिअल, प्रशासकीय व्यवस्थापक अनिल तायडे, प्राचार्य संदीप खंडागळे यांनी कौतूक केले.

**Shreeyash Pratishthan**

Polytechnic | Engineering | Pharmacy | BAMS | MBA| BCA

सकाळ

Sundy 29/12/2024

# परिसर मुलाखतीत 'श्रीयश'च्या २२ विद्यार्थ्यांची झाली निवड

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीयश अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या तसेच एमबीएच्या २२ विद्यार्थ्यांची परिसर मुलाखतीत निवड झाली. श्रीयशमध्ये नुकतीच कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह झाली. यात बीजी लिन इलेक्ट्रिकल्स, एव्हर इलेक्ट्रॉनिक्स पुणे, औरंगाबाद ऑटो ॲन्सिलरी, यशश्री प्रेस कॉम्प, अजाइल टेक्नॉलॉजी सोल्यूशन्स, ग्राइंड मास्टर मशीन्स आणि इन्फिसोल एनर्जी अशा नामांकित कंपन्यांनी सहभाग घेत कौशल्य असलेल्या विद्यार्थ्यांची निवड केली. यामध्ये विद्यार्थ्यांना तीन ते पाच लाखांपर्यंत पॅकेज देण्यात आले आहे. मुलाखत प्रक्रिया बी. टेक. यांत्रिक, विद्युत, इलेक्ट्रॉनिक्स, संगणक शाखा आणि एमबीए मार्केटिंग व एचआर शाखांसाठी आयोजित करण्यात आली होती. निवड झालेल्या २२ विद्यार्थ्यांमध्ये १४ जण अभियांत्रिकीचे तर उर्वरित आठ एमबीएच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या निवडीबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे, विश्वस्त ऐश्वर्या मंगरुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी निवृत्त कर्नल जॉय डॅनियल, प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील, अकॅडेमिक डिन डॉ. पी. एम. अर्धापूरकर, एमबीए महाविद्यालय संचालक डॉ. ज्योती मुंडे यांनी कौतुक केले.

सामना

Thursday 19/12/2024

# श्रीयश अभियांत्रिकीच्या एनसीसी कॅडेट्सनी पटकावली दोन सुवर्णपदके

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) – ५०–महाराष्ट्र बटालियनच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथे आयोजित दहा दिवसांच्या वार्षिक संयुक्त प्रशिक्षण शिबिरात श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या एन.सी.सी. युनिटच्या तेहतीस कॅडेट्सनी दोन सुवर्ण आणि एक रौप्यपदक पटकावले आहे.



श्रीयशच्या कॅडेट्सने कॅम्पदरम्यान अत्युत्तम प्रदर्शन करत 'कॅम्प सीनियर' आणि 'बेस्ट कॅडेट' या श्रेणीत दोन सुवर्णपदके जिंकली. कॅम्प सीनियर गोल्ड मेडल जगदीश घुगे यांना त्यांच्या नेतृत्वाच्या अप्रतिम गुणवत्तेसाठी प्रदान करण्यात आले. 'बेस्ट कॅडेट' गोल्ड मेडल वैष्णवी पिंपळे यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी प्राप्त झाले आहे. चारशे मीटर धावण्याच्या स्पर्धेत रोहिणी सालुंके यांनी रौप्यपदक जिंकले. या व्यतिरिक्त, आठ कॅडेट्सनी 'टग ऑफ वॉर' स्पर्धेत पहिला क्रमांक मिळवला. या कॅडेट्समध्ये जगदीश घुगे, हेमंत पवार, भागवत पवार, सुभाष तारू, रोहित राठोड, पवन चव्हाण, रोहित निंबाळकर आणि शिवनाथ बोलकर यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल बी.पी.एस. ठाकूर, अॅडम ऑफिसर कर्नल कीर्ती मुंडले यांच्या हस्ते पारितोषिक वितरित करण्यात आले. यावेळी बटालियनचे सुभेदार श्रीकृष्ण चव्हाण, हवालदार अनिल मुंडे, हवालदार जितेंद्र सिंह आणि ऑफिस स्टाफ संतोष गवळी उपस्थित होते.

ब्रिजभूषण शुक्ला यांनी कॅडेट्सच्या उत्कृष्ट प्रशिक्षणासाठी केलेल्या कष्टांची माहिती दिली. यशस्वी कॅडेट्सचे श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे, विश्वस्त सदस्य ऐश्वर्या मंगरुळे, संयुक्त सचिव अद्वैत मंगरुळे, मुख्याधिकारी कर्नल जॉय डॅनियल, मुख्याध्यापक डॉ.बी.एम. पाटील, डॉ.पी.एम. अर्धापूरकर, केंद्रीय टीपीसी प्रमुख प्रा. अनिल पालवे आदींनी अभिनंदन केले.

DB स्टार

**Saturday 7/12/2024**

# एनसीसी कॅडेट्सने पटकावली सुवर्णपदके

## श्रीयश अभियांत्रिकीच्या एनसीसी कॅडेट्सने जिंकली ८ सुवर्णपदके

छत्रपती संभाजीनगर | श्रीयश अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटला अमळनेर, जळगाव येथे आयोजित ४९ महाराष्ट्र एनसीसी बटालियनच्या वार्षिक प्रशिक्षण शिबिरात यश आले आहे. या १० दिवसीय शिबिरात महाविद्यालयाच्या एनसीसी कॅडेट्सनी विविध शारीरिक क्षमतांच्या स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन सुवर्णपदके मिळवली.

तोहिद शेख याने शिबिरामध्ये कॅम्प लीडर म्हणून नेतृत्व केले आणि टग ऑफ वॉरमध्ये दोन सुवर्णपदके जिंकली. तसेच इतर विद्यार्थ्यांनी प्रत्येकी एक सुवर्णपदक पटकावले. शिबिरामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सर्व कॅडेट्सना ४९



महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल अनिल राय यांच्या हस्ते पदके प्रदान करण्यात आली.